# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०७/०९/२०२६ (सोमवार )**

.......................................................................................................

## आगामी सणोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी नागपूर ग्रामीण पोलिसांचा रूट मार्च व दंगा नियंत्रणाची रंगीत तालीम

**मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात दिनांक ०७/०९/२०२६ रोजी आगामी सणोत्सवाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच कोणत्याही अनुचित परिस्थितीचा प्रभावीपणे सामना करण्याच्या दृष्टीने नागपूर ग्रामीण जिल्हयात पोलीस स्टेशन उमरेड, भिवापूर, अरोली, रामटेक च्या हद्दीत रूट मार्च व दंगा नियंत्रणाची रंगीत तालीम घेण्यात आली. यावेळी पोलीस अधिकारी व अंमलदार ढाल, लाठी, हेल्मेट इत्यादी दंगा नियंत्रण साहित्याने सज्ज होऊन दंगा नियंत्रणाचा सराव करण्यात सहभागी झाले. तसेच पोलीस दलाची सज्जता, जलद प्रतिसाद क्षमता, पथकांमधील समन्वय तसेच उपलब्ध दंगा नियंत्रण साहित्याच्या हाताळणीचा सराव करण्यात आला.**

**पोलीस स्टेशन उमरेड** :— श्री मयंक माधव, सहायक पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड उपविभाग यांच्या उपस्थितीत पोलीस निरीक्षक श्री धनाजी जळक, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन उमरेड यांच्यासह उमरेड पोलीस स्टेशन येथील अधिकारी आणि अंमलदार, दंगा नियत्रंण पथक आणि होमगार्ड यांनी उमरेड शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला. तसेच दंगा नियंत्रण योजनांचा सराव घेण्यात आला.

**पोलीस स्टेशन भिवापूर** :— सहा. पोलीस निरीक्षक श्री रविंद्र मस्कर, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन भिवापूर यांच्या उपस्थितीत भिवापूर पोलीस स्टेशन येथील अधिकारी आणि

अंमलदार, दंगा नियत्रंण पथक आणि होमगार्ड यांनी भिवापूर  शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला. तसेच दंगा नियंत्रण योजनांचा सराव घेण्यात आला.

**पोलीस स्टेशन अरोली** :— श्री रमेश बरकते, उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक उपविभाग यांच्या उपस्थितीत सहा. पोलीस निरीक्षक श्री सागर गोमासे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन अरोली यांच्यासह अरोली पोलीस स्टेशन येथील अधिकारी आणि अंमलदार, दंगा नियत्रंण पथक आणि होमगार्ड यांनी अरोली  शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला. तसेच दंगा नियंत्रण योजनांचा सराव घेण्यात आला.

**पोलीस स्टेशन रामटेक** :— श्री रमेश बरकते, उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक उपविभाग यांच्या उपस्थितीत पोलीस निरीक्षक श्री थोरात, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन रामटेक यांच्यासह रामटेक पोलीस स्टेशन येथील अधिकारी आणि अंमलदार, दंगा नियंत्रण पथक आणि होमगार्ड यांनी रामटेक शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला. तसेच दंगा नियंत्रण योजनांचा सराव घेण्यात आला.

**आगामी सणोत्सव शांततेत, सुरक्षित व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडावा, यासाठी नागपूर ग्रामीण पोलीस दल सज्ज असून, नागरिकांनीही सणोत्सव शांततेत साजरा करून कायदा व सुव्यवस्था अबाधित राखावी असे आवाहन नागपूर ग्रामीण पोलीसांकडून करण्यात आले आहे.**




झोडे ट्रेडर्स






गांधी चौक
शांतिनाथ
मंदिर
vivo
TECNO
पूजा
विमल ज्वेलर्स
सुगंधालय
OPPO
तुम यहाँ से चले जाओ


MAHARASHTRA POLICE
MAHARASHTRA POLICE
MAHARASHTRA POLICE
MAHARASHTRA POLICE


गांधी चौक
मंदिर
MAHARASHTRA TOURISM
vivo
PUSHP
लाल मिर्च
पावडर
तुरक किराणा
Suhana
POLICE



# आगामी सणोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागपूर ग्रामीण पोलीसांनी घेतल्या प्रशासकीय बैठका, शांतता समिती तसेच आयोजकांच्या बैठका

**आज दिनांक ०७/०९/२०२६ रोजी मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात आगामी गणेशोत्सव तसेच विविध धार्मिक उत्सवांच्या पार्श्वभूमीवर सणोत्सव बंदोबस्त असल्याने कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी नागपूर ग्रामीण जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशन येथे आगामी सणोत्सवांच्या निमित्य विविध बैठका घेण्यात आल्या.**

**पोलीस स्टेशन सावनेर** :— श्री सागर खर्डे, सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर उपविभाग यांचे अध्यक्षतेखाली श्रीमती पोलीस निरीक्षक ऋतुजा जाधव,प्रभारी अधिकारी, सावनेर पोलीस स्टेशन यांच्या उपस्थितीत उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, सावनेर येथे आगामी गणेश विसर्जनाच्या अनुषंगाने प्रशासकीय अधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली. तसेच सार्वजनिक गणेश मंडळांचे पदाधिकारी तसेच डि जे. ,साऊंड सिस्टिमचे चालक, मालक व ऑपरेटर यांची बैठक घेतली.

**पोलीस स्टेशन मोहपा** :— श्री सागर खर्डे , सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर उपविभाग, पोलीस निरीक्षक श्री इश्वर हनवते, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन मोहपा यांच्यासह यांच्या उपस्थितीत आगामी गणेश विसर्जनाच्या अनुषंगाने डिजे मालक आणि शांतता समिती सदस्यांची बैठक घेण्यात आली.

**पोलीस स्टेशन अरोली** :— श्री रमेश बरकते, उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक उपविभाग, सहा. पोलीस निरीक्षक श्री सागर गोमासे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन अरोली यांच्यासह यांच्या उपस्थितीत आगामी गणेश विसर्जनाच्या अनुषंगाने गणेश मंडळ पदाधिकारी आयोजक यांची बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत शांतता समिती, पोलीस पाटील, गणेश मंडळ, प्रांत अधिकारी उपस्थित होते.

**पोलीस स्टेशन कुही** :— पोलीस स्टेशन कुही अंतर्गत तहसीलदार कुही, पोलीस निरीक्षक श्री राजेंद्र पाटील, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन कुही, मुख्य कार्यकारी अधिकारी, नगरपंचायत कुही, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी व कर्मचारी तसेच महावितरण विभागाचे संबंधित अधिकारी यांच्या उपस्थितीमध्ये आगामी सणोत्सव संदर्भात पोलीस स्टेशन

कुहीच्या हद्दीतील तहसील कार्यालय, कुही येथे सर्व संबंधित विभागप्रमुखांची संयुक्त बैठक पार पडली.

**पोलीस स्टेशन भिवापूर** :– सहा. पोलीस निरीक्षक श्री रविंद्र मस्कर प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन भिवापूर यांच्या उपस्थितीत पोलीस स्टेशन भिवापूर येथे आगामी सणोत्सव संदर्भात सर्व डीजे व साऊंड सिस्टीम मालकांची बैठक घेतली.

**पोलीस स्टेशन जलालखेडा** :– पोलीस स्टेशन जलालखेडा अंतर्गत सहा. पोलीस निरीक्षक श्री. विनोद जांभळे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन जलालखेडा, नायब तहसीलदार, जलालखेडा, मुख्य कार्यकारी अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी व कर्मचारी तसेच महावितरण चे मुख्य अभियंता तसेच विविध गणेश मंडळांचे पदाधिकारी, डीजे मालक व पोलीस पाटील यांच्या उपस्थितीमध्ये आगामी सणोत्सव संदर्भात सर्व विभागांची संयुक्त बैठक घेण्यात आली.

**सर्व आयोजकांना विनापरवानगी गणेशमूर्तीची स्थापना करू नये, मंडप उभारण्यासाठी आवश्यक त्या सर्व परवानग्या घ्याव्यात, महावितरणकडून विद्युत जोडणीसाठी आवश्यक परवानगी घ्यावी तसेच गणेश मंडपामुळे रस्त्यावरील वाहतुकीस कोणताही अडथळा निर्माण होणार नाही, याची दक्षता घ्यावी, अशा सूचना देण्यात आल्या. तसेच आगामी सणोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घेण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच जातीय सलोखा राखुन सणोत्सव साजरा करावे असे अवाहन करण्यात आले. यावेळी आयोजकांच्या अडचणी व समस्या जाणून घेण्यात आल्या असून, त्यांचे आवश्यकतेनुसार संबंधित विभागांच्या समन्वयाने निराकरण करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.**




शांतता कमिटी/पोलीस पाटील
बैठक








तहसिलदार
तथा
तालुका दंडाधिकारी
कुही


पोलीस ठाणे जलालखेडा
जि. नागपूर (ग्रा.)
ऑर्बिट


पोलीस स्टेशन भिवापूर
प्रभारी अधिकारी कार्यकाळ

# गणपती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागपुर ग्रामीण जिल्हयात गणेश स्थापना मार्ग ,विसर्जन मार्ग व विसर्जन स्थळाची करण्यात आली पाहणी

गणपती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर स्थापना आणि विसर्जन मिरवणुकी दरम्यान वाहतूक कोंडी, गर्दी, अडथळे, वीजवाहिन्या, रस्त्यांची स्थिती तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेशी संबंधित संभाव्य धोके आधीच ओळखून त्यावर योग्य उपाययोजना करता याव्यात, यासाठी आज दिनांक ०७/०९/२०२६ रोजी खालील पोलीस स्टेशन अंतर्गत अंतर्गत गणपती स्थापना मार्ग, विसर्जन मार्ग तसेच विसर्जन स्थळाची पाहणी करण्यात आली.

**पोलीस स्टेशन सावनेर :—** सदर पाहणी श्री. सागर खर्डे, सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, सावनेर विभाग, सावनेर, श्री. कल्याण कुमार डहाट, उपविभागीय अधिकारी, सावनेर, श्री. अक्षय पोयाम, तहसीलदार, सावनेर, श्रीमती आरशिया जुही, मुख्याधिकारी, सावनेर, श्रीमती ऋतुजा जाधव, पोलीस निरीक्षक, सावनेर तसेच श्री. सतीश ललके, सहाय्यक अभियंता, महावितरण, सावनेर यांच्या उपस्थितीत करण्यात आली.

**पोलीस स्टेशन मोहपा :—** श्री सागर खर्डे, सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर उपविभाग, पोलीस निरीक्षक श्री इश्वर हनवते , प्रभारी अधिकारी, मोहपा पोलीस स्टेशन यांनी महाराष्ट्र राज्य विदयुत मंडळ आणि नगरपरिषद चे अधिकारी यांच्या स्थापना मार्ग, विसर्जन मार्ग तसेच विसर्जन स्थळाची पाहणी केली.

**पोलीस स्टेशन कन्हान :—** सदर पाहणी श्री. शशांत एन एम, सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, कन्हान विभाग, श्री दिपक घोडके, मुख्याधिकारी, कांद्री पोलीस निरीक्षक श्रीमती वैजयंती मांडवधरे, प्रभारी अधिकारी ,पोलीस स्टेशन कन्हान ,अग्निशमन दलाचे अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी तसेच इतर प्रशासकीय अधिकारी यांच्या उपस्थितीत करण्यात आली.

**पोलीस स्टेशन कुही :—** सदर पाहणी श्री अमित घाडगे, तहसिलदार कुही, श्रीमती दिपीका गायकवाड, मुख्याधीकारी नगरपंचायत कुही, पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन कुही, सार्वजनिक बांधकाम विभागाचे स्थापत्य अभियांत्रिक सहाय्यक संपत थोपटे कुही, तसेच महावितरण चे सहायक अभियंता मनोहर भुते यांच्या उपस्थितीत करण्यात आली.

**पोलीस स्टेशन वेलतुर** :— सदर पाहणी श्री. आशिष धनविजय,मंडळ अधिकारी वेलतूर , पोलिस निरीक्षक श्री. प्रशांत काळे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन वेलतुर , श्री. भीमठे,

ग्राम विकास अधिकारी तसेच श्री. पंकज भरले, महाराष्ट्र राज्य विदयुत मंडळ यांच्या उपस्थितीत करण्यात आली.

**पोलीस स्टेशन पाचगाव** :— सदर पाहणी पोलीस निरीक्षक रविंद्र मानकर, प्रभारी अधिकारी,पोस्टे पाचगाव, श्री. दीपक गादे, मंडळ अधिकारी , श्री जितेंद्र राऊत (सहाय्यक अभियंता) पाचगाव महाराष्ट्र राज्य विदयुत मंडळ कार्या, रामभाऊ शंभरकर (कनिष्ठ अभियंता ) सा. बां. उप. वी.उमरेड, व श्री सचिन सोनवाने तलाठी पाचगाव व सुवासिनी कुंभलकर तलाठी धामणायांच्या उपस्थितीत स्थापना मार्ग, विसर्जन मार्गाची पाहणी केली तसेच १)सालाई गोधनी तलाव,२)सालई गोधणी नदी,३) धामणा येथील नदी,४) शिव स्टोन खदान पाचगाव या ठिकाणी भेट देवुन पाहणी केली.

**पोलीस स्टेशन भिवापुर** :— सदर पाहणी श्री संजय राठोड, तहसिलदार, पार्थ शिंडाम, मुख्याधीकारी नगरपंचायत,सहा पोलीस निरीक्षक रविंद्र मस्कर, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन भिवापुर, मुख्य अभियंता पंकज काटमवार, महाराष्ट्र राज्य विदयुत मंडळ यांच्या उपस्थितीत करण्यात आली.

**पोलीस स्टेशन वडोदा** :— सदर पाहणी सपोनी श्री मनोज गदादे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन वडोदा, श्री राजू थोटे, ग्रामविकास अधिकारी, सरपंच वडोदा, महाराष्ट्र राज्य विदयुत मंडळाचे अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता, महसूल विभागाचे अधिकारी, पोलिस पाटील यांचे उपस्थितीत मौजा वडोदा व भूगाव येथील गणपती स्थापना मार्ग, विसर्जन मार्ग तसेच विसर्जन स्थळाची पाहणी करण्यात आली.

**रस्ता तपासणीदरम्यान विसर्जन मिरवणुकीच्या मार्गावरील वाहतूक व्यवस्था, रस्त्यांची स्थिती, संभाव्य अडथळे, गर्दीची ठिकाणे, वीजवाहिन्या, प्रकाशव्यवस्था तसेच विसर्जन स्थळावरील आवश्यक सुविधांचा आढावा घेण्यात आला. स्थापना मार्ग, विसर्जन मार्ग तसेच विसर्जन स्थळाची पाहणी दरम्यान निदर्शनास आलेल्या बाबींवर तातडीने आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशा सूचना देण्यात आल्या. सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वयाने कार्य करून वाहतूक, सुरक्षा, वीज, स्वच्छता आणि नागरिकांच्या सोयीसुविधांबाबत आवश्यक ती दक्षता घ्यावी, असे निर्देश देण्यात आले.**

## सावनेर



## मोहपा



कन्हान




भिवापूर



**कुही**



**वेलतुर**



**पाचगाव**



**भिवापूर**



वडोदा



**अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ०७ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, ०४ लाख ९० हजार ६०० रूपयांचा मुद्देमाल जप्त**

**कुही पोलीसांची कामगिरी**

**पोलीस स्टेशन कुही** :— दिनांक ०६/०९/२०२६ रोजी कुही पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा धानोली येथे काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे कुही पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) संतोष सनोडीया, वय ३८ वर्ष, रा अंबेनगर नागपुर २) मितेंद्र ताजेन्द्र नायडु, वय ४३ वर्ष, रमना मारोती नागपुर ३) जिवनलाल बलराम सनोडीया, वय ३२ वर्ष, रा. अंबेनगर नागपुर ४) तौसिफ शकील शेख, वय २५ वर्ष, रा. प्लाट नं. ३४, न्यु बिडीपेठ**

नागपुर ५) दिलीप पांडुरंग शेंदरे, वय ४६ वर्ष, रा, प्लॉट नं. ५३ निलकमल सोसायटी, नरसाडा नागपुर ६) सागर रमेश बोलधन, वय ३६ वर्ष, रा. रमना मारोती पवनसुत नगर प्लॉट न. २७ नागपुर ७) सिध्दार्थ वसंत मेश्राम, वय ३७ वर्ष, रा. तितुर, ता. कुही, जि. नागपुर यांना ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना जागीच पकडले.

पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तासपत्ते आणि १) रोख रक्कम ७६००/—रूपये, विवीध कंपनीच्या ०९ दुचाकी, ०७ वेगवेगळया कंपनीचे मोबाईल असा एकुण ४,९०,६००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद ०७ आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन कुही येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, ५८ हजार ९४६ रूपयांचा मुद्देमाल जप्त वेलतूर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन वेलतूर** :— दिनांक ०६/०९/२०२६ रोजी वेलतूर पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा पचखेडी येथे काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे वेलतूर पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) मंगेश नारायण भोयर, वय ३० वर्ष २) धनंजय हरीदास ठमके, वय २८ वर्ष ३) दामोघर बाजीराव देशमुख, वय ७३ वर्ष, सर्व रा. पचखेडी यांना ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना जागीच पकडले.**

**पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तासपत्ते आणि १) रोख रक्कम १०५०/—रूपये, २) ०२ मोबाईल आणि इतर साहीत्य असा एकुण ५८,९४६/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद ०३ आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन वेलतूर येथे कलम ४, ५ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अवैधरित्या विनापरवाना देशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, ८१ हजार ५६० रूपयांचा मुद्देमाल जप्त, उमरेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन उमरेड** :— दिनांक ०६/०९/२०२६ रोजी उमरेड पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, दुचाकी वाहनाने एक इसम अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक करीत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ मौजा तारणा गेट येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान सुजुकी कंपनीची मोपेड गाडी क्र. एम एच ४०/सी झेड— २४०५ मिळुन आली. वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली

असता देशी दारू दारूच्या निपा मिळुन आल्या. **आरोपी नामे लंकेश जगदिश पवार, वय २६ वर्ष, रा. राजुरवाडी उमरेड हा अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक करतांना मिळुन आला.**

**पोलीसांनी पंचासमक्ष १) देशी दारूच्या २०७ निपा किंमती १६,५६०/—रूपये २) सुजुकि कंपनीची मोपेड गाडी क्र. एम एच ४०/सी झेड— २४०५ किंमती ६०,०००/—रूपये, ३) ०१ ॲडरॉईड मोबाईल असा एकुण किंमती ८१,५६०/— रुपयांचा मुददेमाल जप्त केला आहे. नमुद आरोपी लंकेंश जगदिश पवार, वय २६ वर्ष, रा. राजुरवाडी उमरेड याचेविरूद्ध महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ११ गुन्हे नोंद

**दिनांक ०६/०९/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली नागपूर ग्रामीण पोलिसांनी अवैध दारूविक्री, दारूची साठवणूक करणाऱ्यांविरूद्ध नागपूर ग्रामीण जिल्ह्यात दारूबंदी कायद्यान्वये एकूण ११ गुन्हे दाखल करण्यात आले. यामध्ये अवैध दारूविक्री तसेच दारूची वाहतूक करणाऱ्यांविरुद्धही नियमांनुसार कारवाई करण्यात आली आहे.**

**पोलीस स्टेशन केळवद** येथे आरोपी नामे जितेन्द्र द्यानेश्वर कोल्हे, वय ३६ वर्ष, रा. वॉर्ड क्रं ०२, नांदागोमुख, ता. सावनेर जि. नागपूर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन सावनेर** येथे आरोपी नामे १) अमन आसाराम धनोले, वय २२ वर्ष, २) भिवन मून्ना उइक वय २३ वर्ष, सर्व रा. धनराज भोंगा शेत जवळ सावनेर यांचेवर १ गुन्हा नोंद, तसेच गुलाब भैया कोल्हे, वय ५० वर्ष, रा. बोरगाव वार्ड क्र ३, सावनेर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन रामटेक अंतर्गत** आरोपी बाळकृष्ण किसनजी टेकाम, वय ४५ वर्षे, रा. इंदीरा नगर कवडक दुधाळा, ता.रामटेक याचेवर १ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन उमरेड अंतर्गत** आरोपी १) लंकेश जगदिश पवार, वय २६ वर्ष, रा. राजुरवाडी उमरेड २) महिला आरोपी यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन वेलतूर अंतर्गत** आरोपी धनपाल उर्फ

साधु तेजराम सोनबावने, वय ३५ वर्ष, रा. बोरीनाईक ता. कुही याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन जलालखेडा अंतर्गत** आरोपी कैलास नामदेव घोरपडे, वय ४५ वर्ष, रा. खरबडी, ता. नरखेड, जि. नागपूर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन काटोल अंतर्गत** आरोपी १) दादाराव बिसन ढोके, रा. भाजीपाणी काटोल, जि. नागपूर २) महिला आरोपी यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन बुट्टीबोरी अंतर्गत** आरोपी शिवकुमार हेमराज मोहारे, वय ३८ वर्ष, रा. बोरखेडी, ता. जि. नागपुर याचेवर १ गुन्हा नोंद.

**नमुद कारवाईत एकुण ४४६४० मिली देशी दारू, २००० मिली विदेशी दारू, ४१ लिटर मोहाफुल दारू, ०१ मोबाईल, ०१ मोटरसायकल असा एकुण ९०,४००/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

जनसंपर्क अधिकारी
नागपुर ग्रामीण जिल्हा